Sonopant Dandekar Shikshan Mandali's

Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College, Palghar

(Best College - University of Mumbai)

(Amongst Top 100 Colleges in India by 'India Today - MDRA Survey 2019')

# Department Of Marathi (2021-2022)

# मराठी वांग्मय मंडळ

## (Marathi Literary Association)

## Name of Programme: Bolit Bolu Spardha (Speak in our Dialects)

## Date: 27.04.2022

## INDEX



| Sr. No. | Details | Page No. |
|---|---|---|
| 1 | Proposal | 2 |
| 2 | Notice of Programme | 3 |
| 3 | Advertise | 4 |
| 4 | Photographs | 5 |
| 5 | News Paper | 7 |

# Proposal

23

SonopantDandekarShikshanMandali's
**SONOPANT DANDEKAR ARTS, V.S. APTE COMMERCE AND**
**M.H. MEHTA SCIENCE COLLEGE, PALGHAR**
Palghar, Dist – Palghar, Pin – 401 404, E – Mail: sdsmcollege@yahoo.com

**मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ** दिनांक ९/०४/२०२२

<u>कार्यक्रमासाठी प्रस्ताव(**PROPOSAL**)</u>

प्रति
मा.प्राचार्य
सोनोपंत दांडेकर कला, वा.श्री.आपटे वाणिज्य
आणि एम एच मेहता विज्ञान महाविद्यालय पालघर.

विषय: मराठी वाङ्मय मंडळाच्या कार्यक्रमाचा प्रस्ताव

कार्यक्रमाचे नाव : 'बोलीत बोलू' अभिव्यक्ती स्पर्धा

आयोजक : मराठी विभाग

कार्यक्रमाची प्रस्तावित दिनांक : 20.04.2022 (बुधवार)

कार्यक्रमाचे हेतू :

१. परिसरातील बोलींचे जतन करणे.
२. बोलींना प्रतिष्ठा प्राप्त करून देणे.
३. बोलकांना एकत्र आणणे.
४. बोलीस्वरूप, वैशिष्ट्ये आणि सौंदर्य जाणून घेणे.

कार्यक्रमाचे माननीय वक्ते : – पालघर जिल्ह्यातील सर्व बोलींचे बोलक

कार्यक्रमाचे स्थळ: गणेश निळकंठ दांडेकर सभागृह/ अमलानी विश्राम कक्ष/ कक्ष क्र. ८

प्रस्ताव सादरकर्ते

(स्वाक्षरी)

सहा. प्रा. विवेक वसंत कुडू
मराठी विभाग प्रमुख

मा. प्राचार्यांचा शेरा

Allowed
(स्वाक्षरी)

9/4/2022

# Notice of Programme

Sonopant Dandekar Shikshan Mandali's

**Sonopant Dandekar Arts, V. S. Apte Commerce & M. H. Mehta Science College, Palghar**

दिनांक: ९.०४.२०२२

## महत्त्वाची सूचना

मराठी विभाग आणि मराठी वाङ्मय मंडळ

## बोलीत बोलू स्पर्धा

**(आपल्या बोलीभाषेत बोला)**

महाविद्यालयातील प्रथम वर्ष कला, द्वितीय वर्ष कला, तृतीय वर्ष कला आणि या वर्गातील मराठी विषय घेतलेल्या सर्व विद्यार्थ्यांना तसेच मराठी वाङ्मय मंडळाशी जोडलेल्या इतर शाखातील विद्यार्थ्यांना सूचित करण्यात येते की मराठी विभाग, मराठी वाङ्मय मंडळ **बुधवार दिनांक** २७.०४.२०२२ रोजी **बोलीत बोलू स्पर्धा** आयोजित केली आहे.

**पालघर जिल्ह्यातील विविध बोली भाषा बोलणारे बोलक या कार्यक्रमात सहभागी होणार आहेत.**

तरी सर्वांनी **बुधवार दिनांक** २७.०४.२०२२ रोजी सर्वांनी गणेश निळकंठ दांडेकर सभागृहात उपस्थित राहावे.

मराठी विभाग प्रमुख

प्राचार्य

Principal,
Sonopant Dandekar Arts College
V. S. Apte Commerce College &
M. H. Mehta Science College
PALGHAR (W.R.)
Dist. Palghar, Pin 401 404.

## Advertisement



## Glimpse of the event






**Pictures with Guest and dignitaries present for session**



## News Paper Cutting

पुढारी

# पालघरमध्ये ‘बोलीत बोलू’ स्पर्धेत महेंद्र हाडळ प्रथम

## द्वितीय हेमांगी सावे, तर तृतीय पारितोषिक सिरीयल जॉन मिनेझिस यांनी पटकावले

**पालघर : पुढारी वृत्तसेवा**



सोनोपंत दांडेकर महाविद्यालयातील मराठी विभागाने आयोजित केलेल्या बोलीत बोलू जिल्हास्तरीय अभिव्यक्ती स्पर्धेला भरघोस प्रतिसाद मिळाला. एकुण ४२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. सावरे गावातील महेंद्र माधव हाडळ यांना प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. मल्हार कोळी बोलीत आगोटीचे दिवस यावर केलेल्या सादरीकरणातून मल्हार कोळी आदिवासी बोलीतील विविध शब्दसंपत्तीचा ओघवता परीचय करून दिला.

स्पर्धेत ५ ते ७७ वयाच्या बोलकांनी बोलीतील विविध आशयाचे सादरीकरण केले. स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे व संस्थेचे सचिव प्रा. अशोक ठाकूर उपस्थित होते. आपल्या जिल्ह्यातील बोलींचे जतन करण्याच्या नैतिक जबाबदारीतून महाविद्यालयाने ही स्पर्धा आयोजित केल्याचे प्राचार्य डॉ. किरण सावे यांनी नमूद केले. तर मबोलीभाषेतून शिक्षण अधिक प्रभावी ठरेल असे मत प्रा. अशोक ठाकूर यांनी व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. तानाजी पोळ उपस्थित होते.

मल्हार कोळी, कोकणा, वंजारी, वाडवळी, भंडारी, आगरी, कुणबी, मांगेला, वैती, फुदगी, कुपारी, पांचाळी, माच्छी इत्यादी बोलीतील बोली वैभव अभिव्यक्तीतून उलगडले. बोलकांनी विविध किस्से, काल्पनिक कथा, माहिती, सामाजिक प्रश्न यांचे सादरीकरण केले. वसई, आगाशी, सातपाटी, मुरबे, डहाणू, बोर्डी, तारापूर, पालघर, विक्रमगड, जव्हार परिसरातील वेगवेगळ्या बोलीतील स्पर्धकांनी सहभाग घेऊन स्पर्धा यशस्वी केली. बोलीचे जतन व संवर्धन व्हावे या हेतूने आयोजित केलेली ही स्पर्धा परस्परांमधील बोली स्नेह वृद्धिंगत करण्यासाठी देखील उपयुक्त ठरली. प्रत्येक बोलकाने दुसऱ्या बोलकाला गुलाबपुष्प देऊन एकमेकांच्या बोलीप्रति असलेला आदर व्यक्त केला.

My Palghar Edition
Apr 30, 2022 Page No. 4
newspaper.pudhari.co.in

# नवराष्ट्र

उपक्रम | सोनोपंत दांडेकर महाविद्यालयातर्फे आयजोन

# 'बोलीत बोलू' जिल्हास्तरीय स्पर्धेला भरघोस प्रतिसाद

**सफाळे,** (वा) सोनोपंत दांडेकर महाविद्यालयातील मराठी विभागाने आयोजित केलेल्या 'बोलीत बोलू' जिल्हास्तरीय अभिव्यक्ती स्पर्धेला भरघोस प्रतिसाद मिळाला. एकुण ४२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. सावरे गावातील महेंद्र माधव हाडळ यांना प्रथम पारितोषिक प्राप्त झाले.

मल्हार कोळी बोलीत 'आगोटीचे दिवस' यावर केलेल्या सादरीकरणातून मल्हार कोळी आदिवासी बोलीतील विविध शब्दसंपत्तीचा ओघवता परीचय करून दिला. स्पर्धेत पाच ते सत्याहत्तर वयाच्या बोलकांनी बोलीतील विविध आशयाचे सादरीकरण केले. स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. किरण सावे व संस्थेचे सचिव प्रा. अशोक ठाकूर उपस्थित होते. आपल्या जिल्ह्यातील बोलींचे जतन करण्याच्या नैतिक जबाबदारीतून महाविद्यालयाने ही स्पर्धा आयोजित केल्याचे' प्राचार्य डॉ. किरण सावे यांनी नमूद केले. तर 'बोलीभाषेतून शिक्षण अधिक प्रभावी ठरेल. असे मत प्रा. अशोक ठाकूर यांनी व्यक्त केले. यावेळी उपप्राचार्य डॉ. तानाजी पोळ उपस्थित होते. मल्हार कोळी, कोकणा, वंजारी, वाडवळी, भंडारी, आगरी, कुणबी, मांगेला, वैती, फुदगी, कुपारी, पांचाळी, माच्छी इत्यादी बोलीतील बोली वैभव अभिव्यक्तीतून उलगडले. बोलकांनी विविध किस्से, काल्पनिक कथा, माहिती, सामाजिक प्रश्न यांचे सादरीकरण केले.




## बोलींच्या जतन व संवर्धनासाठी प्रयत्न

वसई, आगाशी, सातपाटी, मुरबे, डहाणू, बोर्डी, तारापूर, पालघर, विक्रमगड, जव्हार परिसरातील वेगवेगळ्या बोलीतील स्पर्धकांनी सहभाग घेऊन स्पर्धा यशस्वी केली. बोलीचे जतन व संवर्धन व्हावे या हेतूने आयोजित केलेली ही स्पर्धा परस्परांमधील बोली स्नेह वृद्धिंगत करण्यासाठी देखील उपयुक्त ठरली. प्रत्येक बोलकाने दुसऱ्या बोलकाला गुलाबपुष्प देऊन एकमेकांच्या बोली प्रती असलेला आदर व्यक्त केला.

## विजेत्यांचा स्पर्धकांचा गौरव

स्पर्धेत सावरे गावातील महेंद्र हाडळ यांनी प्रथम क्रमांक पटकावला. द्वितीय पारितोषिक हेमांगी सावे व तृतीय पारितोषिक सिरीयल जॉन मिनेझिस यांनी पटकावले. उत्तेजनार्थ पारितोषिके बळवंत रमण पाटील, दिपाली दिलीप पिंपळे, हरीश यशवंत चौधरी, शैलेश मिस्त्री, नंदकुमार बाळकृष्ण राऊत, भारत गवळी यांना देऊन गौरविण्यात आले. विलेन्स दोडती या पाच वर्षांच्या लहानग्याला विशेष पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. स्पर्धेचे परीक्षण प्रा. जगदीश संसारे , रमाकांत पाटील व प्रा. विवेक कुडू यांनी केले. मराठी विभाग प्रमुख प्राध्यापक विवेक कुडू यांनी आयोजक म्हणून महत्त्वाची भूमिका पार पाडली. प्रा. यादव मोरे, डॉ. दर्शना चौधरी, प्रा. निलेश पाटील यांचे तसेच उपप्राचार्य महेश देशमुख यांचे सहकार्य लाभले.


Palghar Plus Edition
30 April 2022 Page No. 1
epaper.navarashtra.com


# बोलीत बोलू स्पर्धेत महेंद्र हाडळ प्रथम

सोनोपंत दांडेकर महाविद्यालय मराठी विभागातर्फे आयोजित केलेल्या बोलीत बोलू जिल्हास्तरीय अभिव्यक्ती स्पर्धेत सावरे गावातील महेंद्र माधव हाडळ यांना प्रथम पारितोषिक प्राप्त झाले. मल्हार कोळी बोलीत आगोटीचे दिवस यावर केलेल्या सादरीकरणातून मल्हार कोळी आदिवासी बोलीतील विविध शब्दसंपत्तीचा ओघवता परीचय त्यांनी करून दिला. द्वितीय पारितोषिक हेमांगी सावे व तृतीय पारितोषिक सिरीयल जॉन मिनेझिस यांनी पटकावले. उत्तेजनार्थ पारितोषिके बळवंत रमण पाटील, दिपाली दिलीप पिंपळे, हरीश यशवंत चौधरी, शैलेश मिस्त्री, नंदकुमार बाळकृष्ण राऊत, भारत गवळी यांना देऊन गौरविण्यात आले. कु. विलेन्स दोडती या पाच वर्षांच्या लहानग्याला विशेष पारितोषिक देऊन गौरवण्यात आले. भरघोस प्रतिसाद मिळालेल्या या स्पर्धेत एकुण ४२ स्पर्धकांनी सहभाग घेतला. स्पर्धेत पाच ते सत्याहत्तर वयाच्या


**पान ३ वर**




# नवराष्ट्र

# दांडेकर महाविद्यालयात 'बोलीत बोलू'

## तेढ निर्माण करणारे प्रकार नसावेत; १६ बोलींपैकी एक निवडावी!

**पालघर,** नवराष्ट्र न्यूज नेटवर्क. बोलींचे जतन आणि संवर्धन व्हावे, यासाठी सोनोपंत दांडेकर महाविद्यालयातील मराठी विभागाने २७ एप्रिल रोजी 'बोलीत बोलू' या अनोख्या स्पर्धेचे आयोजन केले आहे. पालघर जिल्ह्यातील सर्वांसाठी ही खुली स्पर्धा असून जिल्ह्यातील कोणत्याही एका बोलीत स्पर्धकाला बोलायचे आहे. या अभिव्यक्तीत एखादा किस्सा, माहिती, गोष्ट, विनोद, अनुभव, व्यक्तिचित्रण असे काहीही असेल. राजकीय पक्ष, राजकीय तेढ, धार्मिक तेढ, बदनामी अशी कोणती गोष्ट त्यात नसावी. वारली, कोकणा, मल्हार, कोळी, आगरी, भंडारी, वैती, मांगेला, वाडवळ, कुणबी, मांगेला, बारी, माळी माच्छी, पांचाळ, फुदगी इत्यादी पैकी एक बोली निवडावी. बोलण्यासाठी सात मिनिटे असतील. पालघर जिल्ह्यातील बोलींचा लहेजा, बोलीतील जास्तीत जास्त शब्द कसे येतील, अभिव्यक्ती कशी प्रभावी होईल याचा प्रयत्न करावा.



- प्रथम पारितोषिक ३०००, द्वितीय २०००, तृतीय पारितोषिक १५०० आणि उत्तेजनार्थ हजार रुपये आहे.
- सदर स्पर्धेत सहभागी होण्यासाठ सहा. प्राध्यापक विवेक कुडू यांच्या ९०४९५३०४१५ नंबरवर संपर्क साधावा. स्पर्धेसाठी नावनोंदणीची अंतिम तारीख २२ एप्रिल आहे.
- जास्तीत जास्त संख्येने बोलकांनी या स्पर्धेत सहभागी होऊन बोली संवर्धनाच्या चळवळीत आपले सहव द्यावे, असे आवाहन केले आहे.

Palghar Plus Edition
14 April 2022 Page No. 2
epaper.navarashtra.com

# सकाळ

# बोलींच्या संवर्धनासाठी 'बोलीत बोलू' स्पर्धा

**क्षण बहराचे**

बोलींच्या जतन व संवर्धनासाठी पालघर जिल्ह्यातील सोनोपंत दांडेकर महाविद्यालयाच्या मराठी विभागाने 'बोलीत बोलू' ही स्पर्धा येत्या २७ एप्रिलला सकाळी दहा वाजता आयोजित केली आहे. परिसरातील कोणत्याही एका बोलीत सात मिनिटांपर्यंतच्या अवधीत माहिती, गोष्ट, किस्सा, विनोद, व्यक्तिचित्रं आदी सांगायची मुभा 'बोलक्या'ला आहे.

– नीला शर्मा

पालघरमधील जव्हार, मोखाडा, तलासरी, वसई, विक्रमगड, पालघर, डहाणू आणि वाडा या आठ तालुक्यांतील आबालवृद्धांसाठी ही स्पर्धा खुली आहे. महाविद्यालयातील मराठी विभागात सहायक प्राध्यापक असलेल्या डॉ. दर्शना सलील चौधरी म्हणाल्या, ''मराठी भाषा दिनानिमित्त विविध ठिकाणी कार्यक्रम व उपक्रम मोठ्या प्रमाणावर होत असतात. ते महत्त्वाचे असले तरी केवळ प्रमाण मराठी भाषेपुरते मर्यादित राहतात. आपली भाषा ही निरनिराळ्या बोलींनी समृद्ध आहे. परंतु काळाच्या ओघात असंख्य शब्द नामशेष होत चालले आहेत. वयोवृद्ध माणसं जुन्या काळातील हकिगती, किस्से, आठवणी आदी सांगतानाच फक्त काही शब्द ऐकायला मिळतात. त्यांनी वापरलेल्या म्हणी तसंच वाक्प्रचारांमधून मिळणारे कित्येक शब्द, त्यांच्याच नवीन पिढीलाही अनोळखी वाटतात. बोलींचा अनमोल ठेवा जतन करण्यासाठी ही स्पर्धा योजली आहे. यातील अभिव्यक्ती शब्दांकित करून दस्तऐवजीकरणाचा आमचा प्रयत्न आहे.''

चौधरी यांनी स्पष्ट केलं की, अशा तऱ्हेची ही स्पर्धा पहिल्या वेळी फक्त पालघर जिल्ह्यातील बोलींपुरतीच मर्यादित ठेवली आहे. पुढे ही व्याप्ती वाढवण्याचा मानस आहे. पालघर भागात वारली, कोकणा, मल्हार कोळी, आगरी, वाडवळ, भंडारी, कुणबी, वंजारी, मांगेला, वैती, कादोडी, बारी, माच्छी, पांचाळ, फुदगी, माळी व तेली या सतरा बोली प्रचलित होत्या. त्या बोलणाऱ्या कुटुंबातील तरुण घराबाहेर कुणाशीही मराठीतूनच बोलतात. आमच्या महाविद्यालयातील बहुतांश विद्यार्थी ग्रामीण भागांतील आहेत. त्यांची मूळ बोली कुठली, ती कशी आहे यांसारख्या प्रश्नांची उत्तरं देताना अनेकजणांना संकोच वाटतो. प्रत्येक बोलीची काही वैशिष्ट्यं असतात. वेगळा लहजा असतो. कोणती भाषा श्रेष्ठ, हा मुद्दाच नाही. आपापल्या बोलीतील सौंदर्य व संपन्नता अनुभवत ती जपण्या- जोपासण्याची गरज आहे. हा विचार परिसरातील लोकांच्या मनात पेरण्यासाठी ही स्पर्धा, हे महत्त्वाचं पाऊल आहे. स्मृतिचिन्ह व प्रमाणपत्रासह रुपये तीन हजार (प्रथम), दोन हजार (द्वितीय), पंधराशे ( तृतीय) व एक हजार (उत्तेजनार्थ) पारितोषिक देण्यात येणार आहे.

Pune, Pune-Today
19/04/2022 Page No. 5